## "वैश्यवाणी"जाती समाजाबाबत स्पष्टीकरण

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- सीबीसी-१०/२००७/प्र.क्र.१७७/मावक-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २० जून, २००८

वाचा :- १) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
क्रमांक :- सीबीसी -१०९६/प्र.क्र.४८/मावक-५, दिनांक ३ जून, १९९६
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
क्रमांक :- सीबीसी -१०/२००१/प्र.क्र.१२०/मावक-५, दिनांक १ नोव्हेंबर, २००१
३) राज्य मागासवर्ग आयोगाचे पत्र क्रमांक रामाआ/पुणे/वैश्यवाणी/२००७-०८/७७
दिनांक ४ मार्च, २००८

## परिपत्रक

"वैश्यवाणी" या जाती समाजास त्यांच्या जातीबाबतच्या नोंदीमुळे जाती प्रमाणपत्र मिळवितांना व त्याची पडताळणी करतांना अडचणी येत होत्या. या अडचणींचे निराकरण करण्याबाबत शासनाकडे सदर जाती समाजाने निवेदन केले होते. त्याचप्रमाणे काही प्रकरणी न्यायालयीन प्रकरणे उपस्थित झाल्यामुळे मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी "वैश्य", "वाणी" व "वैश्यवाणी" या संदर्भात राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांचेकडून अभ्यासपूर्ण अहवाल प्राप्त करुन तो मा.उच्च न्यायालयास सादर करण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार राज्य मागासवर्ग आयोगाकडुन याबाबत अहवाल मागविण्यात आला. राज्य मागासवर्ग आयोगाने त्यांच्या दिनांक ४ मार्च, २००८ च्या पत्र क्रमांक रामाआ/पुणे/वैश्यवाणी/२००७-०८/७७ अन्वये शासनास अहवाल सादर केला. सदर अहवालामध्ये राज्य मागासवर्ग आयोगाने केलेल्या स्पष्टीकरणानुसार "वैश्यवाणी" या जातीच्या व्यक्तींना जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यासंदर्भात सर्व सक्षम प्राधिकारी आणि विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

(१) हिंदू-वाणी, हिंदू-वैश्य आणि हिंदू-वैश्यवाणी या तिन्ही जाती वैश्यवाणीच आहेत. त्यामध्ये कोणताही फरक करण्याचे कारण दिसत नाही. अज्ञानामुळे किंवा नजर चुकीने जातीच्या सदरात (कॉलममध्ये) अशा वेगवेगळ्या नोंदी दिसून आलेल्या आहेत. त्यामुळे या जातीच्या व्यक्तींना त्यांच्या वडिलांच्या / आजोबांच्या आणि अन्य रक्त नात्यातील व्यक्तीच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये अथवा दस्ताऐवजामध्ये हिंदू-वाणी, हिंदू-वैश्य आणि हिंदू-वैश्यवाणी यापैकी कोणतीही नोंद असेल तर अशा व्यक्तींना ते "वैश्यवाणी" आहेत, असे आयोगाने स्पष्टीकरण केल्यामुळे त्यांना "वैश्यवाणी" जातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

२) ज्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर केवळ "हिंदू" असा उल्लेख असेल अशा व्यक्तींनी "वैश्य", "वाणी" व "वैश्यवाणी" अशा नोंदी असलेली इतर कागदपत्रे (जसे जन्ममृत्यू रजिस्टरवर केलेली नोंद किंवा मालमत्ता रजिस्टरवर केलेल्या नोंदी इत्यादी ) पुराव्यासाठी सादर केल्यास त्यास "वैश्यवाणी" समजण्यात येऊन त्यानुसार त्यांना "वैश्यवाणी" जातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००८०६२०१११४९५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-

**( ज. न. राठोड)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति :-

मा. राज्यपालांचे सचिव,

मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,

मा. उप मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,

मा. मंत्री, ( सामाजिक न्याय ) यांचे खाजगी सचिव,

मा राज्यमंत्री, ( सामाजिक न्याय ) यांचे खाजगी सचिव,

अपर मुख्य सचिव, (महसूल ) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

सर्व विभागीय आयुक्त, (महसूल)

सर्व अतिरिक्त आयुक्त (महसुल)

सर्व सदस्य सचिव, जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या.

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

आयुक्त, अपंग कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक

संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

सर्व जिल्हाधिकारी / तथा जिल्हादंडाधिकारी

सर्व अपर जिल्हाधिकारी

सर्व उपविभागीय अधिकारी (महसूल)

सर्व उपजिल्हाधिकारी

महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,

सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,

सर्व कार्यासने, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई. निवड नस्ती, का- मावक-५